# प्रेसनोट

रिक्षात विसरलेले रोख रक्कम २,००,०००/- पोलीसांचे तत्परतेने मिळाले परत. खडक पोलीसांची उत्तम कामगिरी.

---

दिनांक १८/०८/२०१८ रोजी सायंकाळी १७.०० वा. चे सुमारास, पोलीस नाईक/३५२१ एस. एम. खाडे हे रामोशीगेट चौकी अंमलदार म्हणुन कर्तव्यास हजर असताना, इसम नामे. प्रशांत दत्तात्रय तेली वय २८ वर्षे धंदा - फर्निचर व्यवसाय रा. मु. पो. कडलास ता. सांगोला जि. सोलापुर यांनी रामोशीगेट पोलीस चौकी येथे समक्ष येवून कळविले की, दिनांक १८/०८/२०१८ रोजी ०४.०० वा. चे सुमारास ते व त्यांचे मित्र अल्पाना टॉकीज येथुन शक्ती ट्रान्सपोर्ट, भवानीपेठ या ठिकाणी रिक्षाने येत असताना, तक्रारदार यांनी त्यांचेजवळ असलेली लाल रंगाची बॅग (त्यामध्ये रोख रक्कम २ लाख व लहान ड्रील मशीन) व कटर मशीन रिक्षाचे मागील सिटमागे असलेल्या रिकाम्या जागेत ठेवली. त्यांनतर ते शक्ती ट्रान्सपोर्ट या ठिकाणी आले व रिक्षातुन खाली उतरले. त्यावेळी तक्रार यांनी रिक्षामध्ये ठेवलेली कटर मशीन घेतली. व रिक्षाचालकास रिक्षाचे ठरलेले भाडे दिले. त्यावेळी सदर ठिकाणावरून रिक्षाचालक निघुन गेला. त्यांनतर काही वेळाने तक्रारदार यांचे लक्षात आले की, लाल रंगाची बॅग (त्यामध्ये रोख रक्कम २ लाख व लहान ड्रील मशीन) असलेली रिक्षामध्ये विसरली आहे. म्हणुन त्यांनी त्याबाबत रामोशीगेट पोलीस चौकीस कळविले होते.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सदरची माहिती पोलीस नाईक/३५२१ एस. एम. खाडे यांनी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. राजेंद्र मोकाशी साहेबांना व रामोशीगेट पोलीस चौकीचे चौकी प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक, जे. सी. मुजावर यांना कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली रामोशीगेट मार्शलचे कर्मचारी पो.शि./८८२९ महाविर दावणे असे मिळुन सदर रिक्षाचा शोध घेत असताना, शक्ती ट्रान्सपोर्ट, भवानीपेठ व अल्पाना टॉकीज, नानापेठ येथील येथील काही दुकानामध्ये सदर रिक्षाबाबत सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहण्यात आले. सदर सी. सी. टी. व्ही. फुटेजमध्ये आलेल्या रिक्षा क्रमांकावरून रिक्षा हि गणेशपेठ येथे राहणारे सैय्यद जाफर सैयद अली यांची असल्याचे समजल्याने रिक्षा मालक यांचे घरी जावून चौकशी केली असता, सदरची रिक्षा संदीप सुभाष कांबळे रा. २२७, गणेशपेठ, पुणे हे चालवत असल्याने त्याचे घरी गेले असता, रिक्षा चालक हा नुकतेच घरी येत असल्याने त्यास रिक्षामध्ये राहिलेल्या बॅगबाबत विचारले असता, त्यांनी बॅगबाबत काहीएक माहिती नसल्याचे सांगीतल्याने आम्ही रिक्षा चालक यास त्याची रिक्षा दाखविण्यास सांगीतले असता, आम्ही सदर रिक्षाची पाहणी केली असता, सदर रिक्षाचे मागील शिटचे मागे असलेल्या रिकाम्या जागेमध्ये सदरची बॅग दिसली. सदर बॅगची पाहणी केली असता, सदर बॅगमध्ये तक्रारदार यांची रिक्षामध्ये राहिलेली २,००,०००/- रू. व ड्रिल मशीन मिळुन आली. त्यानंतर सदरची बॅग तक्रारदार यांना देण्यात आली.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. सुहास बावचे, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रदीप आफळे यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री विजयकुमार शिंदे, रामोशीगेट पोलीस चौकीचे चौकी प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक, जे. सी. मुजावर, व पोलीस नाईक/३५२१ सचिन खाडे, पोलीस शिपाई/८८२९ महावीर दावणे, पोलीस शिपाई/८८८५ संदीप कांबळे यांनी केलेली आहे.


सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
विजयकुमार शिंदे
पोलीस निरीक्षक